**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात**

**एस.सी.सी ३९६/२०२२** **निशाणी १५**

**गुन्ह्याचा तपशिल**

१. गुन्हा घडल्याची तारीख – २२.०६.२०२२

२. फिर्याद दिल्याची तारीख – २८.०६.२०२२

३. फिर्यादीचे नाव व पत्ता – महाराष्ट्र शासन तर्फे, पोलीस स्टेशन अधिकारी, अकोले

४. आरोपीचे नाव व पत्ता – सागर विजय देशमुख, वय – २८ रा. इंदोरी, ता. अकोले , जि. अहमदनगर.

५. फिर्यादीमधील मजकुर आरोपीस समजावुन सांगितला

पहिले असे की, तुम्ही आरोपीने दिनांक २२.०६.२०२२ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता अकोले–राजुर रोड, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर येथे तुमचे ताब्यातील गाडी क्रमांक एम.एच. ०४ एच.एक्स. ९६०८ ही निष्काळजीपणे व बेदरकारपणे मनुष्याचे जिवीतास हानी पोहोचेल अशा पद्धतीने चालवून अपघात केलात आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम २७९** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

दुसरे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपीने तुमचे ताब्यातील गाडी क्रमांक एम.एच. ०४ एच.एक्स. ९६०८ ही अविचाराने भरधाव वेगाने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन फिर्यादीचे पती प्रदीप दत्तात्रय देशमुख यांना धडक देऊन किरकोळ दुखापतीस

कारणीभुत ठरलात आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ३३७** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

तिसरे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपीने तुमचे ताब्यातील गाडी क्रमांक एम.एच. ०४ एच.एक्स. ९६०८ ही अविचाराने भरधाव वेगाने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन फिर्यादीचे पती प्रदीप दत्तात्रय देशमुख यांना धडक देवून त्यांना गंभीर दुखापतीस कारणीभुत ठरलात आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ३३८** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

शेवटचे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपीने तुमचे ताब्यातील गाडी क्रमांक एम.एच. ०४ एच.एक्स. ९६०८ ही सार्वजनीक ठिकाणी लोकांना धोकादायक ठरेल अशा पध्दतीने चालवून त्याद्वारे तुम्ही **मोटार वाहन कायदा कलम १८४** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

६. आरोपीचे कथन –

प्रश्न १ – तुम्हाला केसच्या संपुर्ण नकला मिळाल्या काय ?

उत्तर – हो/ये

प्रश्न २ – तुमच्यावर ठेवण्यात आलेला आरोप तुम्हांला वाचुन व समजावुन सांगितला, तो समजला काय ?

उत्तर – हो/ये

प्रश्न ३ – तुम्हांला सरकारी खर्चाने तुमच्या बचावासाठी वकील पाहिजे काय?

उत्तर – नाहि.

प्रश्न ४ – तुम्हांला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर – नाही.

..............................

आरोपीची सही/ अंगठा

समक्ष,

24.11.2025

**( अनंत रा. टेंगसे )**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

कोर्ट नं. २, अकोले.

दिनांक– २४/११/२०२५